# तेजस्विनी इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गारखेडा परिसर मधील तेजस्विनी इंग्लिश स्कूलचे सातवे वार्षिक स्नेहसंमेलन संत एकनाथ रंग मंदिर या ठिकाणी उत्साहात पार पडले. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन एकनाथ बंगाळे, उपजिल्हाधिकारी छत्रपती संभाजी नगर, व श्री राजेश निंबेकर, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माननीय श्री एल. डी. ताटू अध्यक्ष शिवराणा सेवा संघ हे उपस्थित आपल्या भाषणात त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. व कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन कौतुक केले. त्याचप्रमाणे यावेळी विद्यार्थ्यांनी समाजातील ज्वलंत प्रश्न, एकलव्य थीम, अंधश्रद्धा, देशभक्ती, लावणी जागरण गोंधळ इत्यादी नृत्य प्रकार सादर केले. प्रशालेचे संचालक श्री दिगंबर बंगाळे आणि प्राचार्य सौ अर्चना बंगाळे यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री लहू जगताप इत्यादींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भावना कापुरे, धनश्री जाधव, स्वाती गाडेकर व व फाल्गुनी गुजर यांनी केले.आभार प्रदर्शन ऐश्वर्या एखंडे व मंजुषा राठोड यांनी आभार मानले.

# समाजाच्या विविध मागण्यांसाठी रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेच्या वतीने सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांना निवेदन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री नामदार आमदार संजय शिरसाट साहेब यांना रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेच्या वतीने संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.अनिल गवळे सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या व समाजाच्या विविध मागण्या संदर्भानिवेदन दिले

मागण्या खालीलप्रमाणे:-

१) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण कायदा २००९ अंतर्गत आर्थिक दृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थ्यांना आर टी २५% माध्यमातून इंग्रजी खाजगी
शाळेत प्रवेश दिला जातो परंतु तो प्रवेश पहिली ते आठवी या वर्गासाठी आहेत तरी आर टी इ २५% प्रवेश प्रक्रिया माध्यमातून पहिली ते दहावी मोफत शिक्षण देण्याची तरतूद करण्यात यावी.

२) १९९० ते आज पर्यंत महाराष्ट्र ातील शासकीय गायरानावर उदरनिर्वाह करण्यासाठी कसून खात असण्यासाठी अनुसूचित जाती जमाती इतर म ागासवर्गीय घटक तसेच अल्पसंख्यांक मुस्लिमांनी केलेल्या अतिक्रमण कायम स्वरूपी नियमित करण्यात यावे. त्याचा त्यांना तात्काळ सातबारा देण्यात यावा.

३) ज्या धर्तीवर राज्यातील सर्वसम ावेशक जाती धर्माचा राहणीमान्याचा व भौतिक सुविधांचा दर्जा उंचावा म्हणून अनुसूचित जाती व नवबौद्धांसाठी रमाई आवास घरकुल योजना, अनुसूचित जम ातीसाठी शबरी माता घरकुल योजना, तसेच इतर मागासवर्गीयांसाठी प्रधानमंत्री आवास घरकुल योजना आहेत त्याच धर्तीवर अल्पसंख्याक मुस्लिमांसाठी मौलाना आझाद घरकुल योजना राज्य सरकारने राबवावी.

४) डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार शिष्यवृत्ती मध्ये वाढ करण्यात यावी.

यावेळी सोबत संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक प्रा .डॉ. लक्ष्मण ढवळे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा महासचिव मुगदल, जिल्हा सचिव योगेश वाघमारे.

# प्रवेशासाठी डिजीटल पडताळणी पद्धतीचा अवलंब; ज्येष्ठ नागरिकांना नाममात्र शुल्क आकारण्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

विभागीय क्रीडा संकुलात अनधिकृत व्यक्तिंचा प्रवेश रोखण्यासाठी डिजीटल पद्धतीने चेहरा ओळखीची पद्धत अवलंबावी. तसेच ६० वर्षे व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या व्यक्तिंना विभागीय क्रीडा संकुलात चालण्याच्या व्यायामासाठी वार्षिक १०० रुपये इतके नाममात्र शुल्क आकारावे. जे केवळ त्यांच्या नोंदणीसाठीच्या प्रक्रियेकरीता वापरले जावे,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

विभागीय क्रीडा संकूल समितीची बैठक आज विभागीय क्रीडा संकुलात पार पडली. विभागीय आयुक्त दिलीप गावडे, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई तसेच विभागीय क्रीडासंकूल समितीचे सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट यांनी आढावा घेऊन माहिती जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी सांगितले की, विभागीय क्रीडा संकुलाच्या मैदानावर व विविध क्रीडा प्रकारांच्या विशेष मैदानावर सराव करण्यासाठी व नियमित व्यायामासाठी येणाऱ्या खेळाडू व नागरिकांनाच प्रवेश देण्यात यावा.

अन्य अनधिकृत व्यक्तींचा प्रवेश रोखण्यासाठी डिजीटल पद्धतीने चेहरा ओळख ही पद्धती अवलंबावी. बालेवाडी येथील क्रीडा संकुलात 'खेलो मोअर' ही पद्धत वापरली जाते त्याप्रमाणे अत्याधुनिक पद्धती वापरावी.

## मा. मिलिंद दुसाने यांना दीर्घायुष्य लाभो!




छत्रपती संभाजीनगर - दि. ३० जानेवारी रोजी मा.मिलिंद दुसाने (जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर) यांना एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनच्या वतीने शाल आणि पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष, रतनकुमार साळवे, सचिव- संजय सोनखेडे, कार्याध्यक्ष, रशपालसिंग अट्टल, जिल्हाकार्यध्यक्ष, प्रल्हाद गवळी, अट्टलमतचे कार्यकारी संपादक, दिनेश परदेशी, श्रीरंग ससाणे, नितीन दांडगे, प्रकाश खजिनकर, आदी पत्रकार उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सव समिती कार्यकारिणी जाहीर; अध्यक्षपदी प्रवीण जाधव






प्रवीण जाधव
अध्यक्ष



डॉ.डी.एस. काटे
कार्याध्यक्ष



डॉ. जीवन राजपूत
स्वागताध्यक्ष



मनीषा ताई भन्साळी,
उपाध्यक्ष



नवीन ओबेरॉय
उपाध्यक्ष

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'शिव जन्मोत्सव समिती छत्रपती संभाजीनगर'ची बैठक २८ जानेवारी रोजी संपन्न झाली. या बैठकीत संस्थापक अध्यक्ष मा. नितीन भैय्या कदम व संस्थापक सचिव मा.निवृत्ती डक पाटील यांच्या उपस्थितीत शिव जन्मोत्सव समिती २०२५ छत्रपती संभाजीनगर अध्यक्षपदी माझी निवड झाल्यावर या समितीची कार्यकारिणी पत्रकार परिषदेत घोषित करून कार्यक्रम पत्रिका घोषित करण्यात आली आहे. अध्यक्ष-प्रवीण जाधव.कार्याध्यक्ष-डॉ. डी. एस. काटे साहेब. स्वागताध्यक्ष-डॉ. जीवन राजपूत सर व उर्वरित पदाधिकारी. याप्रसंगी उपस्थित उपाध्यक्ष-सौ मनीषा ताई भन्साळी, उपाध्यक्ष नवीन ओबेरॉय, सोमनाथ देवकर पाटील,कोषाध्यक्ष-नितीनजी अजमेरा. सरचिटणीस-निलेश धस.सचिव-सौ. राखीताई सुरडकर, अॅड.सुवर्णा ताई मोहिते. सहसचिव-विकासभैय्या सोनार आदींची उपस्थिती होती.

## शिव जन्मोत्सव समितीतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन

अध्यक्ष प्रविण जाधव यांनी नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातुन आयोजित केले जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यात १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता समितीच्या वतीने संत भगवान बाबा अनाथ आश्रम येथे अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता क्रांतीचौक ते वेरूळ या दरम्यान वाहन रॅली काढण्यात येणार आहे. ही वाहन रॅली ही शहाजी राजे भोसले गढी येथे पोहोचणार आहे. या ठिकाणी समितीचे सदस्य व पदाधिकारी हे गढी परिसराची स्वच्छता करणार आहेत. याशिवाय दुपारी ३ वाजेच्या दरम्यान शहरातील ११ शिवस्मारकाचे दुग्धाभिषेक आयोजित करण्यात आले आहे. तसेच क्रांतीचौकात सायंकाळी दिपोत्सव होईल. रात्री १२ वाजेच्या सुमारास पाळणा व आतिषबाजी केली जाणार आहे. १९ फेब्रुवारीला क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सकाळी ११ वाजता शाहिरी पोवाडा, सह दुपारी १२ वाजेच्या दरम्यान अन्नदानाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. याशिवाय दुपारी ४ वाजेच्या दरम्यान नवनिर्वाचित आमदार खासदार मंत्री यांचाही सत्कार कार्यक्रम क्रांतीचौक येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती जाधव यांनी दिली.

> "पावती विरहित शिवजयंती
> यंदाची शिवजयंती ही सर्वच पद्धतीने आगळीवेगळी करण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात येईल. तसेच ही शिवजयंती पावती विरहित देखील असणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ही स्मरणीय करण्यासाठी समितीपूर्ण ताकदीने कामाला लागली आहे. मी यापूर्वी ही महापुरूषांच्या जयंतीचा अध्यक्ष होतो तर तेथेही पावती विरहितच समारोह साजरे झाले आहे. सर्व जनमाणसाच्या स्मरणात राहील असेच नियोजन समितीकडून होईल.
>
> **-प्रवीण जाधव**
> शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष




हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816